| CNR : MHDH010033382022 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | ०४.१०.२०२२ |
| | नोंदणी तारीख | : | १०.१०.२०२२ |
| | निकाल तारीख | : | १७.१२.२०२५ |
| | कालावधी | : | ०३–वर्ष, ०२–महिने, ०७–दिवस |

**धुळे येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांच्या न्यायालयात**

**( पीठासीन अधिकारी – श्रीमती अ. ब. शर्मा )**

**न्यायनिर्णयाचा दिनांक  १७.१२.२०२५**

**सत्र खटला  क्रमांक – २२१/२०२२**

**निशाणी क्रमांक – ४१**

गुन्हा नोंद क्र. २९३/२०२१, पश्चिम देवपूर पोलीस ठाणे, धुळे, जिल्हा धुळे.

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | महाराष्ट्र शासन (तर्फे –पो.ठा.अं. पश्चिम देवपूर पोलीस ठाणे, धुळे, जिल्हा धुळे.) |
| प्रतिनिधित्व | : | श्री. ए.पी.बागले, सहाय्यक संचालक/सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | : | १. लक्ष्मण फुलसिंग ठाकरे,<br>वय – ४५ वर्षे, धंदा – मजूरी.<br>२. मधुकर उर्फ मधू नारसिंग गायकवाड,<br>वय – ४५ वर्षे, धंदा – मजूरी.<br>३. चंदा उर्फ चंदाबाई लक्ष्मण ठाकरे,<br>वय – ४० वर्षे, धंदा – मजूरी.<br>सर्व रा. इंदिरा नगर, वलवाडी, धुळे, जिल्हा धुळे. |
| प्रतिनिधित्व | : | श्री. सी. एम. भंडारी, अधिवक्ता. |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | १९.१०.२०२१ |
| खबर/फिर्याद नोंदणीचा दिनांक | : | २०.१०.२०२१ |
| दोषारोप पत्राचा दिनांक | : | ०२.०३.२०२२ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | : | ०७.१०.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | ३१.१०.२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | : | -- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १७.१२.२०२५ |
| शिक्षा सुनावल्याच्या आदेशाचा दिनांक, जर काही | : | -- |

**आरोपींचा तपशील** :

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | ठेवण्यात आलेले दोषारोप | निर्दोष सोडले अथवा शिक्षा झाली | सुनावण्यात आलेली शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४२८ चे उद्देशा करिता संपरिक्षा चालू असतांना स्थानबध्द केल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | लक्ष्मण फुलसिंग ठाकरे | १५.११.२०२१ | ०४.१२.२०२१ | भा.दं.वि.कलम ३०७,३५४अ ३२६, ३२३ ५०४, ५०६ सह ३४. | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | मधुकर उर्फ मधू नारसिंग गायकवाड | १५.११.२०२१ | ०४.१२.२०२१ | वरीलप्रमाणे | निर्दोष मुक्त केले | -- | -- |
| ३. | चंदा उर्फ चंदाबाई लक्ष्मण ठाकरे | -- | २०.०९.२०२२ (अटकपूर्व जामीन) | वरीलप्रमाणे | निर्दोष मुक्त केले | -- | -- |

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ. – अभियोग पक्ष :**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | अजय सुभाष शिरसाठ (निशाणी ९) | फिर्यादी/दुखापती. |
| २. | फिर्यादीची पत्नी (निशाणी १३) (सदर गुन्ह्यात विनयभंगाचे आरोप असल्याने पीडितचे नांव जाहीर करण्यात आले नाही.) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार. |
| ३. | मयनोद्दीन हबीब सैय्यद (निशाणी २७) | तपासी अधिकारी. |

**ब. – बचावपक्षाचे साक्षीदार, असल्यास** : नाही.

**क. – न्यायालयीन साक्षीदार, असल्यास** : नाही.

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालय यांच्या निशाणीची यादी

**अ. – अभियोगपक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १० | फिर्यादीवरील फिर्यादीची स्वाक्षरी. |

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| २. | १५ | घटनास्थळ पंचनामा (बचाव पक्षाद्वारे मान्य केला). |
| ३. | १६, १७ | आरोपी क्र.१ व २ यांचे कपडे जप्तीचे पंचनामा (बचाव पक्षाद्वारे मान्य केले). |
| ४. | १८ | जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र (बचाव पक्षाद्वारे मान्य केला). |
| ५. | १९, २० | आरोपी क्र.१ व २ यांचे अटक पंचनामे (बचाव पक्षाद्वारे मान्य केले). |
| ६. | २१ | आरोपी क्र.१ चा निवेदन पंचनामा (बचाव पक्षाद्वारे मान्य केला). |
| ७. | २१–अ | गुन्ह्यातील हत्यार जप्तीचा पंचनामा (बचाव पक्षाद्वारे मान्य केला). |
| ८. | २२ | फिर्यादीचे कपडे जप्तीचा पंचनामा (बचाव पक्षाद्वारे मान्य केला). |
| ९. | २३ | गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल रासायनिक विश्लेषणाकरीता रासायनिक प्रयोगशाळेत पाठविल्याचे पत्र (बचाव पक्षाद्वारे मान्य केला). |
| १०. | २४ | फिर्यादीचा सिव्हिल हॉस्पिटल धुळे येथे जबाब नोंदविण्या करीता आदेश (बचाव पक्षाद्वारे मान्य केला). |
| ११. | २५ | हत्यार तपासणीचा पंचनामा (बचाव पक्षाद्वारे मान्य केला). |
| १२. | २६ | हत्यार परिक्षण करुन वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेला अभिप्राय (बचाव पक्षाद्वारे मान्य केला). |
| १३. | २८ | गुन्ह्याच्या तपासाबाबत देण्यात आलेला लेखी आदेश. |
| १४. | २९,३०,३१ | जप्त मुद्देमालाबाबत मुद्देमाल पावत्या. |
| १५. | ३२ | वाढीव कलमाबाबत न्यायालयास पाठवलेले पत्र. |

| | | |
|---|---|---|
| १६. | ३३ | फिर्यादी व साक्षीदारांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ प्रमाणे जबाब नोंदविण्याकरीता दिलेले पत्र. |
| १७. | ३४ | साक्षीदार क्र.२ (फिर्यादीची पत्नी) च्या जबाबातील अधोरेखांकित भाग–अ. |
| १८. | ३५ | फिर्याद. |
| १९. | ३६ | फिर्यादीमधील अधारेखांकित भाग–अ. |
| २०. | ३७ | अभियोग पक्षातर्फे पुरावा बंद करणेबाबत पुरसिश. |

**ब. बचावपक्षातर्फे निशाणी** – काही नाही.

**क. न्यायालयातर्फे निशाणी** –

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | २ | दोषारोप. |
| २. | ३ ते ५ | दोषारोपांबाबत आरोपींचे निवेदन. |
| १. | ३८ ते ४० | आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणे नोंदवण्यात आलेले जबाब. |

**ड. सामग्री वस्तू** – काही नाही.

## न्या य नि र्ण य

( पारित दिनांक १७ डिसेंबर, २०२५ )

(१) प्रस्तुतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३०७, ३५४(अ), ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वयेच्या अपराधांकरिता आहे.

(२) अभियोग पक्षाच्या खटल्याची हकीगत थोडक्यात खालीलप्रमाणे –

फिर्यादी अजय उर्फ भटू सुभाष शिरसाठ यांनी पोलीसांना दिनांक २०.१०.२०२१ रोजी जबाब दिला. त्यानुसार, दिनांक १९.१०.२०२१ रोजी सायंकाळी ९:०० वाजता फिर्यादी रिक्षा घेवून घरी आले असता त्यांच्या पत्नीने त्यांना सांगितले की, तिचे आरोपी क्र.१ च्या पत्नीसोबत आंगण झाडण्यावरुन भांडण झाले होते, तेंव्हा आरोपी क्र.१ याने बाहेर येवून फिर्यादीच्या पत्नीचा हात धरला व जवळ ओढले. तेंव्हा ती सुटका करुन घरात आली. त्यानंतर फिर्यादीने यांनी आरोपी क्र.१ यांना घराबाहेर बोलावून उपरोक्त कृत्याबाबत जाब विचारला असता आरोपी क्र.१ याने फावडीच्या दांड्याने फिर्यादीच्या डोक्यात मारुन गंभीर दुखापत केली. आरोपी क्र.१ याच्या मुलाने व आरोपी क्र.२ याने फिर्यादी यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. ज्यावेळी फिर्यादीची आई त्यांना सोडविण्यास आली असता तिला देखील आरोपी क्र.१ याने फावडीच्या दांड्याने तिच्या पायावर, पोटरीवर व मांडीवर मारुन जखमी केले व तेथून पळून गेले. त्यानंतर फिर्यादी व त्याच्या आईला हिरे मेडिकल कॉलेज व रुग्णालय धुळे येथे दाखल केले. सदर जबाबावरुन पश्चिम देवपूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. २९३/२०२१ हा भारतीय दंड विधान कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये नोंदविण्यात आला. तपासादरम्यान वाढीव कलम ३०७, ३५४(अ) भा.दं.वि. नुसार दाखल करण्यात आले.

(३) सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक मैनुद्दीन हबीब सैय्यद यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. त्यांनी दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला, दुखापती व इतर साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्यानुसार नोंदविले, दुखापतींचे कपडे तसेच गुन्ह्यातील हत्यार पंचनाम्याद्वारे जप्त केले. त्यांनी दुखापतींचे वैद्यकीय

प्रमाणपत्र हस्तगत केले व आरोपीतांचा अटकेचा पंचनामा केला. संपूर्ण तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा उपलब्ध झाल्याने त्यांनी आरोपींविरुध्द मुख्य न्यायदंडाधिकारी धुळे या न्यायालयात वर नमूद कलमांन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

(४) दोषारोप पत्र प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकरण सुरुवातीला आर.सी.सी. क्र. १४१/२०२२ अन्वये नोंदविण्यात आले. भारतीय दंड संहितेच्या कलम ३०७ अंतर्गत शिक्षेचा गुन्हा हा केवळ सत्र न्यायालयात चालविण्याजोगा असल्याने न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.२) धुळे यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २०७ च्या तरतुदींची पूर्तता करुन आर.सी.सी. क्र. १४१/२०२२ मध्ये निशाणी १ वर दिनांक २४.०८.२०२२ रोजी आदेश पारित करुन सदर प्रकरण सत्र न्यायालयाकडे वर्ग केले. परिणामी, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०९ च्या तरतुदीनुसार प्रस्तुतचा खटला कायद्यानुसार संपरिक्षेसाठी या न्यायालयाकडे वर्ग करण्यात आला.

(५) दोषारोप पत्र प्राप्त झाल्यानंतर प्रस्तुत खटल्यामधील आरोपींवर निशाणी क्र.२ अन्व्ये दोषारोप निश्चित केले. दोषारोपातील मजकूर आरोपींना मराठी भाषेत वाचून सांगितला असता आरोपींनी सदर गुन्हा नाकबूल केला. आरोपींविरुध्द गुन्हा शाबितीसाठी अभियोग पक्षातर्फे उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे तीन साक्षीदारांना तपासले व दाखल केलेल्या कागदपत्रांचा आधार घेतला. त्यानंतर अभियोग पक्षाने पुरसिश निशाणी क्र.३७ अन्वये अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला.

(६) न्यायालयात नोंदविण्यात आलेल्या साक्षीदारांच्या पुराव्यावरुन आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अंतर्गत निशाणी क्र.३८ ते ४० अन्वये निवेदन

नोंदविण्यात आले. आरोपींनी त्यांच्याविरुध्द खोटी फिर्याद व खोटा खटला दाखल करण्यात आल्याचा बचाव मांडला.

(७) सहाय्यक सरकारी अभियोक्ता आणि बचाव पक्षाचे वकिल यांनी केलेला युक्तिवाद ऐकण्यात आला. अभियोग पक्षाचा पुरावा, अभिलेखावरील कागदपत्रे, दोन्ही पक्षांचा युक्तिवाद आणि एकंदरीत अभिलेख पाहता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्यावरील कारणांसह निष्कर्ष पुढीलप्रमाणे देत आहे.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. दिनांक १९.१०.२०२१ रोजी रात्री ९:०० वाजेच्या सुमारास, फिर्यादीच्या घराजवळ, वलवाडी धुळे येथे सर्व आरोपींनी संगनमत करुन, फिर्यादी अजय उर्फ भटू सुभाष शिरसाठ यांचा खुन करण्याच्या उद्देशाने किंवा फिर्यादीचा मृत्यू होऊ शकतो याची जाणीव असतांना आरोपी क्र.१ याने फावड्याच्या दांड्याने फिर्यादीच्या डोक्यावर मारुन दुखापत पोहचविली, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | .. | नाही. |
| २. उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी संगनमत करुन, आरोपी क्र.१ याने फिर्यादीची आई रमनबाई शिरसाठ यांच्या पायावर, पोटरीवर आणि मांडीवर फावड्याच्या दांडा या घातक हत्याराने मारुन स्वेच्छेने गंभीर दुखापत पोहचविली, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | .. | नाही. |

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| ३. उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी संगनमत करुन, आरोपी क्र.२ याने फिर्यादीस हाताबुक्क्यांनी मारहाण करुन स्वेच्छेने दुखापत पोहचविली, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | .. | नाही. |
| ४. उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी संगनमत करुन, आरोपी क्र.१ याने फिर्यादीच्या पत्नीवर फौजदारी पात्र बलप्रयोग करुन तिचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिचा हात धरला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | .. | नाही. |
| ५. उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी संगनमत करुन, शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने फिर्यादीला शिवीगाळ करुन प्रक्षोभित केले, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | .. | नाही. |
| ६. उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी संगनमत करुन, फिर्यादीला फौजदारीपात्र धाकदपटशा केली, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | .. | नाही. |
| ७. काय आदेश ? | .. | आरोपींना निर्दोष मुक्त केले. |

## का र ण मी मां सा

(८) वरील सर्व मुद्दे हे एकाच घटनेशी निगडीत असून पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरिता सदर मुद्दयांचा एकत्रीतपणे विचार करणे इष्ट ठरेल.

**मुद्दे क्रमांक १ ते ६ :**

(९) प्रस्तुत खटल्यात नमूद असलेली घटना सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने साक्षीदार क्र.१ फिर्यादी व त्याची पत्नी साक्षीदार क्र.२ आणि तपासी अधिकारी साक्षीदार क्र.३ यांना तपासले आहे. फिर्यादी व त्याची पत्नी हे फितूर झाल्याने त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे त्यांचा पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही.

(१०) तपासी अधिकारी (सा.क्र.३) यांनी गुन्ह्याच्या तपासात घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.१५), कपडे जप्ती पंचनामे (नि.क्र.१६, १७), निवेदन पंचनामा व जप्ती पंचनामा (नि.क्र.२१ व २१–अ) तसेच फिर्यादी यांचे कपडे जप्ती पंचनामा (नि.क्र.२२) तयार केले व जप्त मुद्देमाल पत्र (नि.क्र.२३) नुसार रासायनिक विश्लेषणाकरीता प्रयोगशाळेला पाठविले. तपासादरम्यान त्यांनी जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र (नि.क्र.१८) हस्तगत करुन जप्त हप्त्यारांचा अभिप्राय अहवाल (नि.क्र.२६) नुसार प्राप्त केला. त्यांनी फिर्यादी व साक्षीदार यांचे जबाब नोंदवून कागदोपत्री सामील केले. तपासादरम्यान त्यांनी फिर्यादी व त्यांच्या पत्नीच्या जबाबातील अधोरेखांकित भाग–अ (नि.क्र.३४ व ३६) नुसार सिध्द केले. सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांनी दोषारोप पत्र न्यायालयात सादर केले.

(११) आरोपींविरुध्द आरोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने सबळ, सुसंगत व मूलभूत पुरावा आणणे आवश्यक होते. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी फिर्यादीतील मजकूराशी विसंगत साक्ष नोंदविल्याने, फिर्याद ही सिध्द होवू शकली नाही. सदर फिर्याद ही पोलीस नाईक श्री. जी. सी. पाटील यांनी

नोंदविली असून, तपासी अधिकारी हे त्यांची सही ओळखत असल्याने त्यांनी सदरची फिर्याद (नि.क्र.३५) नुसार सिध्द केली. परंतु सदरची फिर्याद ही मूलभूत पुरावा नसल्यामुळे फक्त फिर्यादी व तपासी अधिकारी यांची साक्ष आरोप सिध्द होण्याकरीता पुरेसी ठरत नाही.

(१२) फिर्यादी आणि प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांच्या संपूर्ण साक्षीवरुन कथित घटनेच्या दिवशी सर्व आरोपी हे फिर्यादी व साक्षीदारांना शिवीगाळ, अपमान, मारहाण, फिर्यादीच्या पत्नीचा विनयभंग तसेच फिर्यादी व त्याच्या आईला जिवे मारण्याच्या उद्देशाने फावडीच्या दांड्याने व लोखंडी पाईपने स्वेच्छेने मारहाण करुन त्यांना गंभीर जखमी केले, असा निष्कर्ष काढता येत नाही. फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी फिर्याद तसेच दोषारोपात नमूद घटनांविषयी त्यांच्या पुराव्यात काहीएक कथन केलेले नाही. सदर दोन्ही साक्षीदार हे अभियोग पक्षास पूरक अशी साक्ष देत नसल्याने अभियोग पक्षाने त्यांना न्यायालयाच्या परवानगीने उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारले असता त्यांनी उपरोक्त संपूर्ण घटना नाकारली आहे.

(१३) न्यायालयासमोर उपलब्ध पुराव्यावरुन, दिनांक १९.१०.२०२१ रोजी रात्री ९:०० वाजेच्या सुमारास, फिर्यादीच्या घराजवळ, वलवाडी धुळे येथे सर्व आरोपींनी संगनमत करुन, फिर्यादीचा खुन करण्याच्या उद्देशाने किंवा फिर्यादीचा मृत्यू होऊ शकतो याची जाणीव असतांना आरोपी क्र.१ याने फावड्याच्या दांड्याने फिर्यादीच्या डोक्यावर मारुन दुखापत पोहचविली, फिर्यादीची आई रमनबाई शिरसाठ यांच्या पायावर, पोटरीवर आणि मांडीवर फावड्याच्या दांडा या घातक हत्याराने मारुन स्वेच्छेने गंभीर दुखापत पोहचविली, तसेच आरोपी क्र.२ याने फिर्यादीस हाताबुक्क्यांनी मारहाण करुन स्वेच्छेने दुखापत पोहचविली त्याचप्रमाणे आरोपी क्र.१ याने फिर्यादीच्या

पत्नीवर फौजदारी पात्र बलप्रयोग करुन तिचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिचा हात धरला तसेच शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने फिर्यादीला शिवीगाळ करुन प्रक्षोभित केले व फिर्यादीला फौजदारीपात्र धाकदपटशा केली, हे सर्व आरोप अभियोग पक्ष सिध्द करु शकलेला नाही. सबब, मी मुद्दे क्रमांक १ ते ६ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे. परिणामी, सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल, असा निष्कर्ष काढून मुद्दा क्र.७ च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. आरोपी क्र. १. लक्ष्मण फुलसिंग ठाकरे, २. मधुकर उर्फ मधू नारसिंग गायकवाड, ३. चंदा उर्फ चंदाबाई लक्ष्मण ठाकरे यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २३५(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ३०७, ३५४(अ), ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ च्या गुन्ह्याच्या आरोपांतून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जातमुचलके तथा जामीनबंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४३७–अ च्या पूर्ततेसाठी प्रत्येकी रक्कम रुपये १०,०००/– (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) चे वैयक्तिक जामीन बंधपत्र व तितक्याच रकमेचा जामीनदार द्यावा.

४. दोषारोप पत्रात नूद जप्त मुद्देमाल हे मुल्यहीन असल्याने अपील कालावधी संपल्यानंतर, या निकालाविरुध्द कोणतेही अपील किंवा पुनर्निरीक्षण अर्ज ना.

उच्च न्यायालयात प्रलंबित नसल्याची खात्री करुन, सदर मुद्देमालाचा नाश करण्यात यावा.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित व पारित करण्यात आला.

ANITA BAJRANGLAL SHARMA Digitally signed by ANITA BAJRANGLAL SHARMA Date: 2025.12.26 17:49:01 +0530

धुळे. ( श्रीमती अ. ब. शर्मा )

दिनांक : १७.१२.२०२५ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे.

---

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | आय. एस. अन्सारी |
| न्यायालयाचे नाव | : | जिल्हा न्यायाधीश–१ तथा अति. सत्र न्यायाधीश, धुळे यांचे न्यायालय. |
| पीडीएफ अपलोड केल्याचा दिनांक | : | २६.१२.२०२५. |

सही/–
लघुलेखक